ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ . पुणें, बुधवार तारीख ९ सप्टेंबर, १९५९ अंक ३६

## विविध माहिती

**लोकरीच्या आयातींत घट**—तिबेटकडून भारतांत येणाऱ्या लोकरींत बरीच घट झाल्याची वार्ता आहे. तिबेटमधील अस्थिर राजकीय परिस्थितीचा हा परिणाम असावा. लोकरीचा तुटवडा पडूं नये म्हणून उत्तर-प्रदेश सरकारनें उपाययोजना सुरू केली होती. सध्यां उत्तर-प्रदेश राज्यांत मेंढ्यांची निपज करण्याचीं ७५ केंद्रें काम करीत आहेत.

**मद्रास राज्यांत अणुशक्तीचें वीजकेंद्र**—तामील नाडमध्यें अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणारें एखादें केंद्र उभारण्याचे प्रयत्न मध्यवर्ती सरकारच्या साह्यानें मद्रास सरकार करीत आहे. मद्रास राज्यांतील जलविद्युत् केंद्राबाबतची सर्व शक्यता वापरण्यांत आल्यानें आतां अणुशक्तीवरील विजेचीच शक्यता उरली आहे असें मद्रासच्या वीजमंत्र्यांचें म्हणणें आहे.

**मध्यप्रदेशांतील खनिजें**—मध्यप्रदेशांतील बस्तार जिल्ह्यांत संगमरवरी दगडाच्या खाणी मोठ्या प्रमाणावर सांपडण्याची शक्यता भूस्तरशास्त्रज्ञांनीं व्यक्त केली आहे. ह्या भागांत संगमरवरी दगडाशिवाय चुनखडीचा दगड, मँगेनीज, चायना क्ले, इत्यादि खनिजेंहि सांपडण्याचा संभव आहे. पावसाळा संपल्यावर भारताचें भूगर्भ-खातें ह्या भागाची तपशीलवार पहाणी करणार आहे.

**रशिआंत अमेरिकेचें प्रदर्शन**—अमेरिकेच्या औद्योगिक प्रगतीची रशियन लोकांना कल्पना यावी म्हणून कांहीं दिवसांपूर्वी मॉस्को येथें अमेरिकन सरकारनें एक प्रदर्शन उघडलें होतें. ह्या प्रदर्शनाला दररोज ६५,००० रशिअन लोक भेट देत असत व तेथील अमेरिकन माहितगारांना अमेरिकेविषयीं हरतऱ्हेचे प्रश्न विचारीत असत.

**विमेदारांचें नुकसान**—आयुर्विमा कॉर्पोरेशननें विमापत्रकावरील बोनस जाहीर करण्यांत दिरंगाई केल्यामुळें बऱ्याच विमेदारांचें नुकसान झालें अशी तक्रार करण्यांत येत आहे. ज्या विमापत्रकांत हप्ता न भरल्यास विमापत्रक आपोआप चालू ठेवण्याची व्यवस्था होती व जीं विमापत्रकें आरंभींच्या हप्त्यापासून तीन वर्षांच्या आंतबाहेर होतीं तीं बोनस वेळेवर जाहीर झाला असता तर रद्द होण्याचा धोका उत्पन्न झाला नसता, असा तक्रारीचा आशय आहे

**कृष्णा नदीवरील नवा पूल**—उंब्रजजवळ कृष्णा नदीवर पूल बांधण्यासाठी मुंबई सरकारनें ५,८०,००० रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. पुलाची लांबी ४०० फूट होईल. पूल पूर्ण झाल्यावर वाहतुकीची चांगली सोय होणार आहे. विशेषतः चिपळूणपासून पंढरपूरपर्यंत जाणाऱ्या मार्गावरील वहातूक निर्वेध होईल. उंब्रजजवळ पूल नसल्यामुळें सध्यां बरीच अडचण होते.

**राजस्तानमधील आत्मघात**—१९५५ पासून १९५९ च्या जुलै महिन्यापर्यंत राजस्थानांत १,४०३ लोकांनीं आत्मघात करून घेतला अशी माहिती राज्याच्या गृहमंत्र्यांनीं विधानसभेंत सांगितली. गेल्या चार वर्षांत दररोज एक ह्या हिशोबानें लोकांनीं आत्मघात करून घेतल्याचें दिसून आलें. आत्मघाताच्या कारणांबद्दल माहिती देण्यांत आली नाहीं.

**नवीन रेल्वेमार्गांची बांधणी**—बंगाल व आसाम राज्यांत नव्यानें काढण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्यांची गरज भागविण्यासाठीं तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत नवीन रेल्वेमार्ग बांधण्यांत येणार आहेत. त्याशिवाय ह्या भागांतील पोलादाच्या कारखान्यांची वाहतुकीची व्यवस्था नीट होण्यासाठींहि नवीन मार्ग उपयोगी पडणार आहेत.

**लहान मुलांच्या दांतांचें आरोग्य**—मुंबई सरकारनें लहान मुलांना होणाऱ्या दंतरोगाची पहाणी केली आहे. ह्या पहाणींत शहरांतील व ग्रामीण भागांतील ३०,००० मुलांच्या दांतांची पहाणी करण्यांत आली. भारतांत दंतवैद्यकाचें शिक्षण घेतलेले असे डॉक्टर्स १,००० पेक्षाहि कमी आहेत. तथापि, दंतवैद्यकाचा व्यवसाय करणारे मात्र ७,००० लोक आहेत.

**स्त्रियांसाठी वसतिगृह**—अखिल भारतीय महिला परिषदेच्या दिवंगत अध्यक्ष श्रीमती अनसूयाबाई काळे ह्यांच्या स्मरणार्थ स्त्रियांसाठीं एक वसतिगृह बांधण्यांत येत आहे. वसतिगृह बांधण्यासाठीं एक लाख रुपये खर्च येणार आहे. तें बांधण्याच्या कामीं दक्षिण मध्यप्रदेश महिला परिषदेनें पुढाकार घेतला आहे.

**अहमदाबाद शहरांत नवें प्रसूतिगृह**— अहमदाबाद कॉर्पोरेशननें बांधलेल्या एका नव्या इस्पितळाचें व प्रसूतिगृहाचें उद्घाटन मुंबई राज्याचे गव्हर्नर श्री. श्रीप्रकाश ह्यांनीं केलें. प्रसूतिगृहाच्या उद्घाटनप्रसंगीं बोलतांना गव्हर्नरांनीं कुटुंबनियोजनाचा प्रसार करण्याचे कामीं डॉक्टरांनीं विशेष लक्ष द्यावें असें सांगितलें.

दातांच्या स्वच्छतेसाठी
☆ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

**श्रीनगर येथें वैद्यकीय कॉलेज**—काश्मीरमधील मेडिकल कॉलेज श्रीनगर येथें सुरू करण्यांत आलें आहे. कॉलेज स्थापन करण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें मदत दिली आहे. कॉलेजमध्यें अद्यावत् पद्धतीचीं साधनें ठेवण्यांत आलीं असून प्राध्यापकहि श्रेष्ठ दर्जाचे ठेवण्यांत आले आहेत. मुलांसाठी एक व विद्यार्थिनींसाठी एक वसतिगृहहि उघडण्यांत आलें आहे.

**ब्रिटिश नाटक कंपनीचा दौरा**—ब्रिटनमधील ऑक्सफर्ड प्ले हौस कंपनी ही नाटक कंपनी येत्या नोव्हेंबरमध्यें भारत व सीलोनचा १६ आठवड्यांचा दौरा करणार आहे. आपल्या दौऱ्यांत बर्नार्ड शॉ, शेक्सपिअर आणि टी. एस. इलिअट ह्या नाटककर्त्यांचीं नाटकें कंपनी करणार आहे. कंपनी ९ नोव्हेंबर रोजीं पुण्याला 'ट्वेल्थ नाइट' ह्या नाटकाचा प्रयोग करील.


**डॉ. फ्यूक्स ह्यांचा गौरव**—अणुबाँबच्या बनावटीचें रहस्य रशिआला देण्याचें काम करणारे ब्रिटिश शास्त्रज्ञ डॉ. फ्यूक्स ह्यांना पूर्व जर्मनींत अणुविज्ञानाचें संशोधन करण्यासाठी एका मोठ्या जागेवर नेमण्यांत आलें आहे. रशिआच्या बाजूनें हेरगिरी केल्याच्या आरोपावरून ब्रिटननें त्यांना ९ वर्षें कारावासाची शिक्षा केली होती.

**तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामुग्री**—भारताचें तेल व नैसर्गिक-वायु खातें बडोदा येथील एका कारखान्याशीं तेलाच्या विहिरी खोदण्याची यंत्रसामुग्री तयार करण्याविषयीं बोलणीं करीत आहे. गुजरातमधील बऱ्याच भागांत तेल सापडण्याची शक्यता असल्यानें ही यंत्रसामुग्री जवळच कोठेंतरी करणें सोयीचें होईल. सध्यां ती परदेशांतून आयात करावी लागते.

**तांदुळाच्या निर्यातीला बंदी**—मध्यप्रदेशांतील बेतुल जिल्ह्याचा कांहीं भाग मुंबई राज्याच्या सरहद्दीला लागून आहे. ह्या सरहद्दीवर तांदुळाची निर्यात बेकायदा होत असल्याच्या वार्ता आहेत. मध्यप्रदेश सरकारनें तांदुळाच्या निर्यातीवर पूर्वीच बंदी घातलेली आहे. निर्यात बंदीचा हुकूम खेड्यांतून योग्य रीतीनें प्रसिद्ध झालेला नाहीं असें कळतें.

**मध्यप्रदेशांतील घरांचा प्रश्न**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मध्यप्रदेश सरकारनें कामगारवर्गासाठी ५,००० घरें बांधण्याचें ठरविलें आहे. सरकारच्या मजूरखात्यानें आखलेल्या ह्या योजनेंत ग्वाल्हेर, उज्जैन, नागदा, राजनद्गांव, बऱ्हाणपूर, देवास, कटनी, इत्यादि औद्योगिक शहरांचा समावेश करण्यांत आला आहे.


किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळप करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षें बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)



अभिनव गुंतवणूक

आपणांस आपल्या पैशाचा योग्य मोबदला

(शेड्यूल्ड) बँक ऑफ पूना, लिमिटेड (बँक

यांच्या

तीन – सहा – नऊ – बारा महिने मुदतीच्या ठेवींनें मिळतो.

कॅशसर्टिफिकेट इतकेंच व्याज. व्याज मिळून शिवाय रकमेची जरूर भासली तर ३ ते ५ वर्षें थांबावें लागत नाहीं. व्याज मुदत पुरी झाल्याबरोबर मिळतें व याच रकमेवर पुन्हां व्याज मिळवितां येतें. मुख्य ऑफिस अगर शाखाकचेऱ्यांकडे समक्ष चौकशी करा.

गो. गं. साठे, मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ९ सप्टेंबर, १९५९







संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे



## भारताला अधिक आर्थिक साह्य देण्याचें महत्त्व

अमेरिकेच्या सिनेटच्या परराष्ट्रीय संबंध कमिटीनें भारत व चीन ह्यांच्यामधील आर्थिक भरभराट घडवून आणण्याच्या स्पर्धेचें महत्त्व अमेरिकन लोकांना स्पष्ट करून सांगणारा एक अहवाल तयार केला आहे. ह्या स्पर्धेचें महत्त्व अमेरिकन लोकांना पटलें तर अमेरिकेच्या परराष्ट्रीय धोरणावर फार मोठा परिणाम होईल असें अहवाल तयार करणाऱ्या सदस्यांचें मत आहे. अहवालांत असें म्हटलें आहे कीं, भारतामधील आर्थिक विकासाचे प्रयत्न हे लोकशाहीच्या चौकटींत बसण्यासारखे आहेत. आर्थिक विकासाबरोबरच लोकांच्या राहणीचें मानहि सुधारलें पाहिजे अशी भारताची भूमिका आहे. चीनहि आर्थिक भरभराट घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहे. पण हा प्रयत्न सर्वग्राही कम्युनिझमलाच करतां येण्यासारखा आहे. पाठ मोडेपर्यंत काम आणि रहाणीच्या मानांत मात्र अत्यल्प सुधारणा असें चीनचें सूत्र आहे. आशिआंत व जगांतील इतर भागांत जे अर्धविकसित देश आहेत त्यांच्या भवितव्यावर भारत व चीन ह्यांच्या औद्योगिक व आर्थिक विकासाच्या यशापयशाचा दीर्घ काल-पर्यंत परिणाम होत राहणार आहे. प्रत्यक्ष फलश्रुतीच्या दृष्टीनें चीननें भारतापेक्षा लक्षांत भरण्यासारखी प्रगति केलेली आहे ह्यांत शंका नाहीं. भारतालाहि कदाचित् लोकशाहीचीं पथ्यें पाळूनहि केली त्यापेक्षा अधिक प्रगति करतां आली असती असें मानण्यास जागा आहे. केलेल्या प्रगतीपेक्षा अधिक प्रगति भारतानें करावी असें वाटत असल्यास परदेशांकडून त्याला भरीव प्रमाणांत भांडवलाची मदत मिळाली पाहिजे ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे. गेल्या कांहीं वर्षांत चीननें एकूण राष्ट्रीय उत्पन्न-वाढींत व बचतीच्या व भांडवल-गुंतवणुकीच्या वेगांत खूप वाटचाल केलेली आहे.

त्या मानानें भारताच्या प्रगतीचा वेग कमी आहे. चीनचें एकूण राष्ट्रीय उत्पन्न दरसाल सरासरी १० टक्क्यानें वाढलें तर भारताचें ३·५ टक्क्यांनीं वाढलें. उलटपक्षीं भारतानें रोजच्या गरजा भागविणाऱ्या वस्तूंचें उत्पादन चीनपेक्षा अधिक वेगानें वाढविलेलें आहे. चीनमध्यें अर्थव्यवस्थेवर सरकारची हुकमत असते. त्यामुळें बचतीचें व भांडवल गुंतवणुकीचें प्रमाण झपाट्यानें वाढविणें शक्य होतें. शिवाय, भांडवल-गुंतवणुकीला मूलभूत आर्थिक विकासाच्या दृष्टीनें जरूर ती दिशाहि सरकारला देता येते. तसें भारताला करतां येत नाहीं. कम्युनिस्ट पद्धतीच्या सरकारचें हें वैशिष्ट्य आहे कीं, मूलभूत आर्थिक विकास झपाट्यानें घडवून आणून राहणीची किमान पातळी तें राखूं शकतें, व लोकांना विकासाची किंमत देणें भाग पाडतें. कांहीं कांहीं बाबतींत चीनचा मूलभूत आर्थिक विकास हा पूर्वी चालू असलेल्या पण पुढें बंद पडलेल्या योजना पुन्हां चालू करण्याचाच एक भाग आहे. अर्थात् अशा योजना विकासाच्या मूल-भूत योजनांत नवी भर टाकीत आहेत असें म्हणतां येत नाहीं. आगामी कालांत चीनचा मूलभूत आर्थिक विकास पहिल्या इतक्या झपाट्यानें होणार नाहीं. त्यामुळें भारत व चीन ह्यांच्या-मध्यें ह्या बाबतींत जी तफावत दिसते ती कमी कमी होत जाईल. ही तफावत कमी होत जाणें भारत परदेशांकडून भांडवल आकर्षित करण्याच्या कामीं किती यशस्वी होतो, त्यावर अवलंबून आहे. भारताचीं स्वतःचीं साधनें मर्यादित आहेत. कारण लोकांची राहणी कमी प्रतीची आहे. त्यांत पुन्हा लोक-संख्येची वाढ होत असल्यामुळें दरडोई उत्पन्न घटत आहे आणि त्यामुळें भांडवलाची गरज अधिकच वाढत आहे. चालू दशकांत भारत व चीन ह्यांना पुढारलेल्या परदेशांकडून भांडवलाचा पुरवठा कसा व किती होतो ह्यावर फार मोठ्या गोष्टी अवलंबून आहेत.

## सुएझच्या कालव्याचा व्यवस्थित कारभार

सुएझच्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या कालव्याचा कारभार तीन वर्षांपूर्वी इजिप्तच्या ताब्यांत आला. ह्या कालव्याचा कारभार हाकण्याचें काम इजिप्तच्या तंत्रज्ञांना झेपणार नाहीं अशी शंका त्या वेळीं अनेक ठिकाणीं व्यक्त करण्यांत आली होती. पण गेल्या तीन वर्षांचा कारभार पाहतां ही शंका निराधार ठरली आहे. युरोपमधील तंत्रज्ञांनाच असलीं कामें करतां येतात असा भ्रम मुद्दाम पसरविण्यांत आला होता. त्याचीहि आतां निराकरण झालें आहे, इतकेंच नाहीं तर उपयुक्ततेच्या दृष्टीनें ह्या कालव्याचा कारभार अधिकच चांगला चालविण्यांत येत आहे. कालव्यांत होणाऱ्या अपघातांचें प्रमाण बरेंच कमी झालेलें आहे. त्याचप्रमाणें, कालव्यांतून जाणाऱ्या बोटींची संख्याहि वाढली आहे. शिवाय, बोटींना कालव्यांतून पार पडण्यास वेळहि कमी लागूं लागला आहे. कालव्याच्या कारभार मंडळानें त्याच्या विस्ताराची व सुधारणेची एक मोठी योजना तयार केली आहे. कालव्याची खोली व रुंदी वाढविण्याचें काम प्रथम हातीं घेण्यांत येणार आहे. तें पूर्ण झाल्यावर ६५,००० टन वजनाचीं जहाजें कालव्यांतून ये-जा करूं शकतील. पुढील वर्षीं ह्या योजनेवर २·१२ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. तथापि, कालव्याची सर्वांगीण सुधारणा करण्यासाठी खूपच मोठी रक्कम खर्च करावी लागणार आहे. सर्वांगीण योजनेच्या पहिल्या टप्प्यासाठी जागतिक बँकेनें तीन वर्षांपूर्वी २० कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. आतां पूर्ण योजना अंमलांत आणण्याच्या कामीं संयुक्त अरब प्रजासत्ताक व जागतिक बँक ह्यांच्यांत कर्जाबद्दल एकमत झालें आहे. ह्यावरून संकल्पित योजनेच्या भरीवपणाबद्दल व इजिप्शिअन तंत्रज्ञांच्या कारभार-विषयक कौशल्याबद्दल खात्री पटण्यास हरकत नाहीं.

**शिकॅगो प्रदर्शनांतील मंडप**—शिकॅगो येथें नुकत्याच भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापारी प्रदर्शनांत भारतानें मांडलेला गाळा दुसऱ्या क्रमांकाचा होता. प्रदर्शनांत हातमागाचें कापड व ग्रामोद्योगाच्या वस्तु मांडण्यांत आल्या होत्या. त्यांनीं लोकांचें खूपच लक्ष वेधून घेतलें. ह्या मालाला अमेरिकेंत चांगली बाजारपेठ मिळूं शकेल.

### चलनवाढीवर तोडगा : इंडोनेशिआचें उदाहरण

इंडोनेशिआंतील चलनाची किंमत एक पंचदशांशाइतकी खाली गेल्यामुळें सरकारला अतिशय कडक उपाययोजना करणें भाग पडलें. इंडोनेशिअन सरकारनें १,००० आणि ५०० रुपयांच्या चलनी नोटांची किंमत नऊ दशांशांनीं कमी केली आहे आणि बँकांत लोकांनीं आणि संस्थांनीं ठेवलेल्या २५,००० रुपयांवरील ठेवींचा ९०% भाग गोठवून टाकला आहे. ही गोठवलेली रक्कम ठेवीदारांनीं दिलेलें कर्ज म्हणून समजण्यांत येईल. मासिक २,००० रुपयांपेक्षा जास्त पगाराच्या सरकारी नोकरांच्या पगारांत ५०% कपात करण्यांत आली आहे. खासगी मालक वर्गानेंहि अशीच कपात करावयाची आहे. ह्या सर्व योजनांमुळें खूपच चलन काढून घेतलें जाईल. चलनविस्तार आवाक्याबाहेर गेला, म्हणजे सरकारला कशी उपाययोजना करणें भाग पडतें ह्याचें हें उदाहरण आहे. त्याबरोबरच अन्न आणि वस्त्र ह्यांचा पुरवठाहि वाढविला पाहिजे, हें उघड आहे.

### नेपा मिल्सचा नफा

नॅशनल न्यूज.प्रिंट अँड पेपर मिल्स लि. ला ३१ मार्च, १९५९ असेर संपलेल्या वर्षी '२६·८२ लक्ष रु. नफा झाला. त्यामुळें, ताळेबंदांतील तोट्याची रक्कम तेवढ्यानें कमी होऊन ती १·७२ कोटी रु. वरून १·२६ कोटी रुपयांवर आली. अहवालाचे वर्षी एकूण २१,८३८ टन न्यूजप्रिंटचें उत्पादन झालें; म्हणजे उत्पादनांत ५०% वाढ झाली. विक्रीचा आंकडा १·२९ कोटी रुपयांवरून २·२८ कोटी रुपयांवर गेला. मध्यवर्ती सरकार व मध्यप्रदेश सरकार ह्यांनीं कंपनीला दिलेल्या कर्जापैकीं कांहीं कर्जाचें भाग-भांडवलांत रूपांतर करण्यांत आल्यामुळें कंपनीचें त्यांना देणें अनुक्रमें ३२·३७ लक्ष रु. व १·०५ कोटी रु. एवढें उरलें आहे. अहवालाचे वर्षी कंपनीनें मध्यप्रदेश सरकारचें १०·१२ लक्ष रुपये स्वतःच्या शिलकींतून फेडले.

### लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनचें वाढतें काम

(आकडे कोटी रुपयांचे, सप्टेंबर ते ऑगस्ट)

| | भारतांतील | भारताबाहेरील | एकूण |
|---|---|---|---|
| पहिलें वर्ष | १६६·१३ | ५·२७ | १७१·४० |
| दुसरें वर्ष | २८१·७५ | ५·३५ | २८७·१० |
| तिसरें वर्ष (जुलै, १९५९ पर्यंत) | ३४०·२२ | ६·४७ | ३४६·६९ |

### सरकारी कंपन्यांचें आर्थिक वर्ष

सर्व सरकारी कंपन्यांचें आर्थिक वर्ष समान असावें, असें भारत सरकारनें ठरविलें आहे त्या दृष्टीनें योग्य तीं पावलें टाकलीं जात आहेत. एक्सपोर्ट रिस्क इन्शुअरन्स कॉर्पोरेशन. रिझर्व्ह बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, लाइफ इं. कॉर्पोरेशन, इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन, रीहॅबिलिटेशन फिनॅन्स अॅडमिनिस्ट्रेशन, इत्यादि संस्थांचीं वर्षें बदललीं जाणार नाहींत; त्यांच्या कारभारासाठी स्वतंत्र कायदे आहेत.

### सहकारी कर्जपुरवठा : वैकुंठराय मेहता कामिटी

शेती करणाऱ्या कुटुंबांना पुरेसें भांडवल कसें देतां येईल, सहकारी बँकिंगच्या मूलतत्त्वांस धरून धोरण कसें ठेवायला हवें, इत्यादि प्रश्नांचा विचार करण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें श्री. वैकुंठराय मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली आहे.

### बँकांनीं ठेवींवरील व्याजाचे दर उतरविले

दिनांक १ सप्टेंबरपासून बँकांनीं ठेवींवरील व्याजाचे दर अर्ध्या टक्क्यानें उतरविले आहेत. तीन महिने किंवा त्यापेक्षा जास्त मुदतीच्या ठेवींवर आतां ३½% व्याज दिलें जाईल. सात दिवस ते तीन महिने मुदतीला २¾% व्याज मिळेल. ठेवींतील मुदती ठेवींचें वाढतें प्रमाण, वाढते खर्च, किफायतशीर गुंतवणुकीस कमी वाव, इत्यादि कारणांमुळें ठेवींवरील व्याज कमी करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. द्यावयाचें व्याज कमी केलें, तरी कर्जांवर आकारावयाच्या व्याजाचा दर मात्र कमी होणार नाहीं.

धी बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

## जाहीर खबर

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बँकेची ४८ वी वार्षिक साधारण सभा सोमवार दिनांक २८ सप्टेंबर १९५९ रोजीं दुपारीं ३ वाजतां ( स्टँ. टा. ) बँकेच्या रजिस्टर कचेरींत ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९, बँकहाऊस लेन, फोर्ट, मुंबई, ) खालील कामांकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९५९ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटा-पत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. नफा वांटणीचा दर जाहीर करणें.

३. हिशेब तपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

४. पोट नियम ४७ प्रमाणें निवडलेल्या व नेमणूक झालेल्या डायरेक्टरांचीं नांवें जाहीर करणें.

५. पोट नियम २ ( इइ ) व ५७ ( जे ) ( ३ ) मध्यें खालील प्रमाणें दुरुस्त्या करणें.

हल्लींच्या पोटनियम २ ( इइ ) ऐवजीं खालीलप्रमाणें पोट-नियम घालणें.

"To guarantee Letters of Credit for import of machinery and/or other requisites under Licence from the Government or to guarantee payments of money for purchase of machinery and/or other requisites, or to generally give bankers' guarantee on behalf of co-operative societies registered under the said Act or any such Act in operation in the Indian Union or on behalf of other consituents and depositors of the Bank."

पोटनियम ५७ (जे) (३) असेर खालीलप्रमाणें जादा वाक्य घालणें.

"or to generally give bankers' guarantee on their behalf and to give such guarantees on behalf of other constituents and depositors of the Bank."

मुंबई,
४, सप्टेंबर, १९५९.

संचालक मंडळाच्या हुकमावरून,
वाय. बी. गायतोंडे,
मॅनेजर.

भागाच्या तबदिलाचें काम ( ट्रान्सफर बुकें ) सोमवार ता. १४ सप्टेंबर १९५९ ते शनिवार ३ ऑक्टोबर १९५९ पर्यंत ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तारीख १२-९-१९५९ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल असतील त्यांना बुधवार ता. २८-१०-५९ पासून मुंबई ऑफिसमधून त्यांची डिव्हिडंडची रक्कम दिली जाईल.

### दि कराड अर्बन को. बँक लि., कराड

चेअरमन :—वि. कृ. तांबवेकर, बी. ए., एलएल. बी.
मॅ. डायरेक्टर :—शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी.

वरील बँकेनें गेल्या वर्षी सर्व बाबतींत प्रगति केली आहे. खेळतें भांडवल ३८½ लक्ष रुपयांवरून ४३ लक्ष रुपयांवर गेलें. खेळत्या भांडवलाशीं व्यवस्था खर्चाचें प्रमाण १·०४%, स्वतःच्या भांडवलाचें १३·२५%, ठेवींचें ८६·७५%, कर्जाचें ४९·२०% असें पडतें. अहवालाचे वर्षी बँकेस ३२,८१२ रु. नफा झाला. भागदारांना ६½% डिव्हिडंडसाठी ९,०६२ रु. लागतील. बँक नेहमीप्रमाणें 'अ' वर्गातच आहे. दि. २१ मार्च, १९५९ रोजीं सहकार मंत्री ना. बाळासाहेब भारदे ह्यांनीं बँकेस भेट दिली, त्या वेळीं त्यांनीं खालीलप्रमाणें शेरा लिहिला आहे. "संस्थेची आर्थिक परिस्थिति फार समाधानकारक आहे. गेल्या ४०–४२ वर्षांच्या काळांत या बँकेची स्पृहणीय वाढ होत आहे. सेवाभावी, कार्यचतुर आणि व्यवहारी अशा कार्यकर्त्यांच्या प्रभावी संचा-मुळेंच या बँकेची एवढी प्रगति होऊं शकली आहे. भरपूर ठेवी, गिऱ्हाईक कुळांचें योग्य समाधान, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट, इत्यादि अनेकविध रीतींनीं ही बँक नागरी क्षेत्रांतील जनतेची सेवा करीत आहे." ताळेबंदांत व नफातोटापत्रकांत प्रत्येक बाबीच. शक्य तेवढा जास्त तपशील दिलेला आहे, हें कराड अर्बन को. बँकेच्या हिशेबपत्रकांचें एक वैशिष्ट्य सांगतां येईल. थक-बाकी कमी करण्याकडे बोर्डानें सभासदांचें लक्ष वेधलें आहे.

---

### जनता सहकारी बँक लि., पुणें

अध्यक्ष :—ग. रा. वाळिंबे, चेअरमन :—गो. प्र. भागवत
मॅ. डायरेक्टर :—द. शं. जगदग्नि

वर्ष अखेर बँकेचे सभासद ५९९ असून बँकेचें भाग भांडवल ६५,८५० रु. आहे. १९५७–५८ सालीं हेच आंकडे अनुक्रमें ५३४ आणि ५४ १७५ रु. असे होते. बँकेकडील ठेवी ८,६१,८७४ रु. च्या ११,४९,८५६ रु. वर गेल्या. ३० जून १९५९ अखेर बँकेकडील रोख व इतर बँकांतील शिल्लक व इतर रोख्यांतील गुंतवणूक ही ६,३४,८०० रु. आहे. सभासदांना व नाममात्र सभासदांना अहवालाच्या सालीं विविध तारणांवर दिलेल्या कर्जाचा आंकडा रु. ५,७८,५१९ एवढा आहे; गेल्या सालापेक्षा हा आकडा २,०१,४०४ नें वाढला आहे. अहवालाचे सालीं कर्जाची वसुली अत्यंत व्यवस्थितपणें होत आहे. कर्जवसुलीसाठी लवादाकडे अहवालाचे सालीं एकहि प्रकरण पाठवावें लागलें नाहीं. तसेंच या वर्षी बँकेच्या कर्जापैकीं थकबाकीचें प्रमाण २·७ आहे. मागील वर्षी हें प्रमाण ५·५ होतें. सभासदांची कर्जावरील व्याजाचा दर कमी करण्याची सातत्याची मागणी आणि बँकेचा वाढलेला व्यवहार लक्षांत घेऊन बोर्ड ऑफ् डायरेक्टर्सनीं सोनें गहाणाशिवाय इतर कर्जावरील व्याजाचा दर दिनांक १–७–५९ नंतर कर्ज घेणाऱ्यास द. सा. द. शें. नऊच्या-ऐवजीं द. सा. द. शें. साडेसात केला आहे. अहवालाचे वर्षी बँकेनें सरकारच्या योजना यशस्वी होण्यास जरूर ती आर्थिक मदत जनतेकडून मिळावी आणि त्याचबरोबर जनतेस काट-कसरीची संवय लागावी या दृष्टीनें बँकेच्या सभासदांनीं नॅशनल सेव्हिंग्ज बाँड्स् हप्त्यानें खरेदी करण्याची योजना आंखली. सदर योजनेचें उद्घाटन मुंबई राज्याचे बांधकाममंत्री ना. बाळासाहेब देसाई यांनीं केलें. सदर योजनेंत बँकेच्या ५७ सभासदांनीं व नाममात्र सभासदांनीं भाग घेतला. बँकेला अहवालाचे वर्षी ६,८०० रु. नफा झाला. भागदारांना द. सा. द. शें. रु. ४·६० डिव्हिडंड मिळणार आहे.

कार्यकारी मंडळानें नुकताच एक महत्त्वाचा ठराव केला आहे. तो असा कीं, दिनांक १–७–५९ पासून सोनेंगहाणाशिवाय इतर सर्व प्रकारचे कर्जव्यवहारावर द. सा. द. शें. रु. ७·५० न. पै. टक्केप्रमाणें व्याजाचा दर केलेला आहे. बँकेच्या प्रारंभापासून गेलीं ९ वर्षे सतत चालू असलेला ९ टक्के हा दर कमी करण्यांत कार्यकारी मंडळानें सभासदांचे सहकार्यावर व त्यांचे बँकेवरील प्रेमावर संपूर्ण विश्वास बाळगला आणि सभासदांचे हितासाठी धिटाईनें हें पाऊल उचललें. हें पाऊल उचलतांना कमी येणाऱ्या व्याजाची वसुली कार्यकारी मंडळाचे नजरेसमोर असूनहि सभा-सदांना सवलतीचे व्याजाचे दरानें आर्थिक मदत व्हावी आणि सहकारी संस्था काढण्यांत मूलतः असलेला उद्देश साध्य व्हावा या हेतूनें हा उपक्रम सुरू केला आहे.

---

### दि ठाणा, कुलाबा अँड बाँबे सबर्बन डि. को. लँड मॉर्गेज बँक लि., कल्याण

चेअरमन : दौलतराव जयरामराव झुंजारराव
मॅनेजर : सि. स. देशमुख

वरील बँकेचे २,३७२ सभासद असून शेअर भांडवल ७०,६४५ रु. आहे. रिझर्व्ह फंड ७,८६४ रु. आहे. सभासदांकडून येणें कर्ज ८,१७,४५४ रु. आहे. सालअखेर थकबाकी १,४४,७१६ रु. आहे. मुंबई बँकेचें १,७५,६३३ रु. (मुद्दल) थकलेलें आहे. व्याजाची सर्व रक्कम देण्यांत आली आहे. अहवालाचे वर्षी ६९,३०० रु. चीं कर्जे देण्यांत आलीं. बँकेस १०,२२६ रु. तोटा आला. १९५८ सालअखेरचा शिलकी तोटा ३८,७८६ रु. आहे. "जे शेतकरी स्वतः जमीन कुळाकरवीं करतात, त्यांना कुळाकडून खंड मिळणें जवळ जवळ अशक्य-प्राय झाल्यामुळें, अशा कर्जदारांकडून बँकेच्या कर्जाची मुळींच फेड होत नाहीं. थकलेल्या व्याजाची एकूण रक्कम ६९,०६८ रु. असून त्या सर्व रकमेची पुरेपूर तरतूद ताळेबंदांत करण्यांत आली आहे. त्यामुळें बँकेस तोटा दिसत आहे. अहवालाच्या सालीं बँकेच्या दोन शाखा (एक कुलाबा जिल्ह्यांत अलिबाग येथें व दुसरी ठाणें जिल्ह्यांत पालघर येथें) उघडण्यांत आल्या. सर्वसाधारणपणें, चालू वर्षी पिकांचे भाव समाधानकारक असतांहि, थकबाकीचा वसूल पुरेसा होऊं शकला नाहीं" असा अहवालांत उल्लेख आहे.

---

### सासवड माळी शुगर फॅक्टरीचा गणेशोत्सव

दि सासवड माळी शुगर फॅक्टरी लि. चा गणेशोत्सव सालाबाद-प्रमाणें साजरा होत आहे. गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष श्री. ह. ब. गिरमे हे असून श्री. ग. स. कारभारी हे उपाध्यक्ष आहेत. श्री. भ. वा. पवार हे चिटणीस आहेत. कार्यक्रमांत भजन, कीर्तन, भावगीत, नाटक, नृत्य, गायन, जादू, इत्यादींचा समावेश आहे. शुक्रवार दि. ११ रोजीं हळदीकुंकुसमारंभ व सोमवार दि. १४ रोजीं श्रीसत्यनारायण पूजा आहे.

---

**भाक्रा–नांगल बांधकामाची दुरुस्ती**— भाक्रा–नांगल योजनेंतील कांहीं बांधकामाची अपघातांत पडझड झाली होती. ही पडझड दुरुस्त करण्यासाठी ५४ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला होता. पण, आतां ह्या दुरुस्ती-साठी ६ कोटी रुपये खर्च येईल असा दुरुस्त अंदाज तज्ज्ञांनीं व्यक्त केला आहे.

## सहकारी शेतीचे फायदे

( लेखक : श्री. श्रीमन् नारायण, नियोजन मंडळाचे एक सदस्य )

सहकारी संयुक्त शेतीची कल्पना देशावर अकस्मात् लादण्यांत आली असा विचार करणें चुकीचें आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत सहकारी शेती कार्यक्रमाचा उल्लेख करण्यांत आला असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ग्रामीण पुनर्रचनेच्या कार्यक्रमाचें सहकारी शेती हें एक महत्त्वाचें अंग आहे याची कदाचित् पुरेशी जाणीव झालेली दिसत नाहीं.

सहकारी संयुक्त शेतीपद्धति ही हुकूमशाही राष्ट्रांत प्रचलित असलेल्या सामूहिक शेतीपासून मूलतःच भिन्न आहे ही गोष्ट स्पष्टपणें समजून घेतली पाहिजे. पहिली गोष्ट अशी कीं, सहकारी शेतींत सहभागी होणें ही एक खुषीची बाब आहे तर सामूहिक शेती ही वरवर लोकशाहीधिष्ठित दिसली तरी वस्तुतः ती एक सक्तीची गोष्ट आहे. दुसरी गोष्ट अशी कीं, भारतीय नियोजनांत संकल्पिलेल्या सहकारी शेतांचें क्षेत्रफळ ५० ते १०० वा २०० एकरांपर्यंत आहे, तर हुकूमशाही राष्ट्रांतील सामूहिक शेतांचें क्षेत्रफळ ५,००० ते ४० वा ५० हजार एकरांपर्यंतहि असतें. या सामूहिक शेतांच्या प्रचंड आकारमानामुळें शेतकऱ्यांचें व्यक्तित्व नाहींसें होऊन ते एका प्रचंड यंत्राचे छोटे भाग होणें अगदीं साहजिक आहे. तिसरी गोष्ट अशी कीं, मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण हा सामूहिक शेतीचा एक अत्यावश्यक भाग आहे तर भारतांतील सहकारी शेतांनीं प्रमाणाबाहेर यांत्रिकीकरण करण्याची आवश्यकता नाहीं. आपल्या देशांतील प्रचंड लोकसंख्येचा विचार करतां विस्तृत क्षेत्रांत व यांत्रिक पद्धतीनें शेती करण्याची आवश्यकता नसून ठराविक क्षेत्रांतच जास्तींत जास्त लागवड करण्याची गरज आहे.

### दहा आर्थिक लाभ

भारतांतील शेतकऱ्यांस सहकारी शेतीचे स्पष्ट असे फायदे दिसून आले तरच तो त्यांत सहभागी होईल ही गोष्ट अगदीं उघड आहे. सहकारी संयुक्त शेतीचे किमान दहा असे आर्थिक लाभ पुढीलप्रमाणें आहेत :—

( १ ) सहकारी प्रयत्नांमुळें जनावरें व मनुष्यबळाचा अधिक शास्त्रीय पद्धतीनें उपयोग केला जाईल.

( २ ) शेतींत सुधारणा करण्यासाठी विशेषतः पाणीपुरवठा व सुधारलेल्या अवजारांसाठी सर्व साधनांचें एकत्रीकरण होऊन भांडवलांत वाढ करणें शक्य होईल.

( ३ ) जपानी पद्धतीनें भात शेती करणें, सुधारलेल्या जातींच्या बियाण्यांचा, वनस्पति व कंपोस्ट खताचा, जंतुनाशकांचा वापर करणें यासारख्या शेतकी तंत्रांचा शेतकऱ्यांना अधिक प्रमाणांत अवलंब करतां येईल.

( ४ ) शेतांवर तयार झालेल्या मालासाठीं सहकारी बाजारपेठ मिळवून मध्यस्थाकडून होणारी आर्थिक पिळवणूक टाळण्यांत येईल.

( ५ ) ग्रामीण जीवनाची सहकारी पायावर आंखणी करून स्थानिक नेतृत्व निर्माण करतां येईल,

( ६ ) सहकारी शेतीसारख्या उच्च स्वरूपाच्या आर्थिक व्यवस्थेंत खेड्यांतील अनेक शिक्षित तरुण सहभागी होतील व त्यांचें शहरी विभागांकडे होणारें स्थलांतर थांबेल.

( ७ ) छोटे व गरीब शेतकरी कर्ज देण्यास लायक नाहींत असें आज मानलें जातें. परंतु ते सहकारी शेतींत सामील झाल्यावर त्यांस पुरेशीं कर्जें व इतर सवलती मिळूं शकतील.

( ८ ) संयुक्त शेतीमुळें शेतकीला पूरक म्हणून निरनिराळे ग्रामोद्योग व प्रक्रिया उद्योग स्थापन होऊन खेड्यांची आर्थिक व्यवस्था अधिक समृद्ध व विविधांगी होईल.

( ९ ) सहकारी शेतीमुळें सरकारला शेतीसाठी आवश्यक अशा निरनिराळ्या गोष्टींचा पुरवठा करतां येऊन त्यांत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांस अधिक पद्धतशीरपणें व कार्यक्षम रीत्या तांत्रिक ज्ञानाचा लाभ मिळूं शकेल. त्याचप्रमाणें शेतकीविषयक आंकडेवारीहि अधिक शास्त्रीय पद्धतीवर व विश्वासार्ह स्वरूपांत मिळवितां येईल.

( १० ) सहकारी शेतीमुळें शेतीचें अधिक चांगल्या प्रकारें नियोजन होऊन खेड्यांतील स्त्रीपुरुषांस सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी अधिक वेळ मिळेल.

भारतीय शेतकरी स्वखुषीनें सहकारी शेतींत सहभागी होण्यासाठी सहकारी शेतीचे हे दहा लाभ भारतीय शेतकऱ्यांस चांगल्या प्रकारें समजून दिले गेले पाहिजेत.

### शेतकरी सहकारी शेतींतून बाहेर पडूं शकेल का ?

सहकारी शेतीचे कांहीं टीकाकार एकादा शेतकरी एकदा का सहकारी शेतींत सामील झाला कीं मग त्यास त्यांतून बाहेर पडणें कधींहि शक्य होणार नाहीं असा प्रचार करीत आहेत. हा समज सुद्धां संपूर्णपणें चुकीचा आहे. अर्थात् एकादा शेतकरी सहकारी शेतींत सामील झाल्यावर त्यानें कांहीं वर्षें तरी या पद्धतीचा चांगला अनुभव घेतला पाहिजे ही गोष्ट खरी.तथापि कांहीं वर्षांनंतर त्यास सहकारी शेतींत सहभागी राहणें तोट्याचें वाटल्यास त्यांतून तो बाहेर जाऊं शकतो; मात्र त्यानें तशी साधारणतः एक वर्ष पूर्वसूचना दिली पाहिजे आणि त्याचप्रमाणें त्यानें घेतलेलें कर्ज इत्यादींची परतफेड करून तो त्याबाबतच्या आपल्या जबाबदारींतून मोकळा झाला पाहिजे. यानंतर त्यास परत आपल्या शेतावर जाऊन अथवा तितक्याच किंमतीच्या दुसऱ्या शेतावर जाऊन शेती करतां येईल. या सर्व गोष्टी सहकारी शेतीसंस्था स्थापन करतांना ठरविण्यांत आलेल्या करारांतील अटींवर अवलंबून राहतील. सहकारी शेती सर्वत्र एकाच पद्धतीनें असूं नये. स्थानिक परिस्थितीस सोईस्कर होईल अशा रीतीनें त्याचप्रमाणें शेतकऱ्यांच्या इच्छेनुसार योग्य ती पद्धत स्वीकारण्यांत यावी.

### सेवा सहकारी संस्था

आपल्या पंतप्रधानांनीं अनेक वेळां भर देऊन सांगितल्याप्रमाणें या कार्यक्रमांत आपला मुख्य भर देशांत पुढील दोन-तीन वर्षांत सेवा सहकारी संस्था स्थापण्यावर असला पाहिजे. शेतकऱ्यांस सहकारी शेतीच्या प्रत्यक्ष फायद्यांची जाणीव होऊन ते आपणहूनच संयुक्त शेती स्थापण्यास सुरवात करतील अशी अपेक्षा आहे. देशांतील सहकारी शेतीचा वेग वाढविण्याचा सामाजिक वा राजकीय कार्यकर्त्यांनीं प्रयत्न करूं नये. त्याचप्रमाणें जमीन सुधारणा टाळण्याच्या आणि सरकारकडून आर्थिक साहाय्य मिळविण्याच्या लबाड हेतूनें स्थापन होणाऱ्या सहकारी शेती संस्था स्थापण्यास प्रोत्साहन मिळतां कामा नये. तसेंच सध्यां व्यवस्थित रीत्या न चालणारीं सहकारी शेत केंद्रें शक्य तितक्या लवकर बंद केलीं पाहिजेत.

आपल्या देशांत सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी होणें हें सहकारी शेती संस्था स्थापण्याच्या कार्यांत शेतकऱ्यांस मार्गदर्शन व साह्य करणाऱ्या सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांच्या सचोटीवर व कार्यक्षमतेवर अवलंबून आहे. सहकार हा एक जीवनमार्ग असून त्यांवर संपूर्ण विश्वास असलेले लोकच इतरांचें मन त्या मार्गाकडे येण्याकरितां वळवूं शकतील.

# मुंबई राज्याची दुसरी पंचवार्षिक योजना

## झालेलें कार्य व पुढील कार्याची दिशा

## (२)

### बांधबंदिस्ती बाबतच्या इष्टांकांत वाढ

पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत ११ लाख एकर क्षेत्राची बांधबंदिस्ती करण्याचा इष्टांक ठरविण्यांत आला होता, परंतु त्यांत वाढ करून आतां तो १७ लाख एकर एवढा ठरविण्यांत आला आहे. १९५६–५८ या दोन वर्षांत यांपैकी २·१६ लाख एकर क्षेत्रांत बांधबंदिस्ती करण्यांत आली असून १९५८–५९ सालीं यांत आणखी ३·८४ लाख एकर इतक्या क्षेत्राची भर पडली असावी असा अंदाज आहे. या योजनेचा विशेष असा कीं, अहमदनगर जिल्ह्यांत कर्जत आणि पारनेर या दोन तालुक्यांत प्रयोग म्हणून या कामासाठी शेतकऱ्यांच्या स्वयंस्फूर्त श्रमदानाचा उपयोग करून घेण्यांत आला. हा प्रयोग यशस्वी झाला असून त्यामुळें सुमारें १½ लाख एकर क्षेत्राची बांधबंदिस्ती होईल असा अंदाज आहे. विदर्भ आणि मराठवाडा विभागांतहि शेतांना बांध घालण्याचें काम हातीं घेण्यांत आलें असून सौराष्ट्र आणि कच्छ विभागांत उतारानुसार बांध घालण्यांत येत आहेत.

### समाज–विकास

पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत समाज–विकास योजना कार्यक्रमासाठी ३०७५·३१ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली असून योजनेच्या अखेरीपर्यंत सबंध राज्य समाज–विकास आणि राष्ट्रीय विकास योजनांखाली यावें असा मूळचा कार्यक्रम होता. परंतु बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसीप्रमाणें ह्या कार्यक्रमाची विभागणी करून आतां ऑक्टोबर १९६३ पर्यंत सबंध राज्य या कार्यक्रमाखाली आणण्याचें ठरलें आहे. समाज-विकास योजना आणि राष्ट्रीय विकास योजना यांच्यांतील फरक आतां नष्ट करण्यांत आला असून आतां विकास गटांची पहिला टप्पा आणि दुसरा टप्पा अशी विभागणी करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें या राज्याचा सर्व ग्रामीण विभाग द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या अखेरीपर्यंत समाज–विकास कार्यक्रमाखाली आणण्यांत येणार आहे.

### पाटबंधारे व वीजयोजना

पाटबंधारे आणि वीज यांसाठी सबंध मुंबई राज्याच्या पंचवार्षिक योजनेंत एकूण १३६·५९ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. या विभागासाठी हातीं घेण्यांत येणाऱ्या योजनांचें स्थूलमानानें वर्गीकरण पुढीलप्रमाणें आहे: (१) विविधोद्देशी योजना, (२) मोठ्या आणि मध्यम आकाराच्या पाटबंधारे योजना, (३) वीजयोजना. या तीन प्रकारच्या योजनांसाठी पुढीलप्रमाणें तरतूद करण्यांत आली आहे. (१) विविधोद्देशी योजना (४६·६० कोटी रुपये), (२) मोठ्या आणि मध्यम आकाराच्या पाटबंधारे योजना (६६·०६ कोटी रुपये), आणि (३) वीज योजना (२३·९३ कोटी रुपये).

यांपैकी १९५८–५९ साळअखेरपर्यंत सुमारें ६१·२३ कोटी रुपये खर्च झाले असावेत. १९५९–६० सालीं या कार्यक्रमावर ३२·६१ कोटी रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. मुंबई राज्य वीजमंडळाच्या निरनिराळ्या विद्युत्‌योजनांपासून १९५९–६० सालीं अंदाजें ७७,००० किलोवॅट इतकी जादा वीज निर्माण होईल अशी अपेक्षा आहे.

### सडकांचा विकास

मुंबई राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत दळणवळणाच्या कामासाठी एकूण २०७१·७० लक्ष रुपयांची जी तरतूद करण्यांत आली आहे, ती पुढीलप्रमाणें आहे:—पूर्वीचें मुंबई राज्य विभाग १,१०२·०२ लक्ष रुपये, सौराष्ट्र ५५०·०० लक्ष रुपये, कच्छ ७२·७० लक्ष रुपये, मराठवाडा १५७·३० लक्ष रुपये आणि विदर्भ १८९·६८ लक्ष रुपये.

याशिवाय पूर्वीच्या मुंबई राज्य विभागाच्या प्रदेशांतील ग्राम व जिल्हा स्थानिक मंडळाच्या सडकांसाठी ३३७·६०लक्ष रुपये, कच्छमध्यें नव्या डिव्हिजनची स्थापना करण्यासाठी ५·५६ लक्ष रुपये आणि राज्यांत स्थापन करावयाच्या रस्ते–तथा संशोधन संस्थेसाठी १२·६६ लक्ष रुपये अशी जी तरतूद करण्यांत आली आहे त्याचाहि समावेश करण्यांत आला आहे. अशा रीतीनें राज्य-योजनेंत,सडकांच्या विकासासाठी २,४२७·५२लक्ष रुपयांची एकूण तरतूद आहे. १९५८–५९सालीं योजनेच्या उरलेल्या तीन वर्षांत विदर्भांतील सडकांच्या विकासासाठी म्हणून नियोजन समितीनें आणखी२५०लक्षरुपये देण्यास परवानगी दिली आहे. त्याचप्रमाणें राज्यांतील ऊस-उत्पादनाच्या प्रदेशासाठी ३·३६ कोटी रुपये खर्चाचा एक खास कार्यक्रम आंखण्यांत आला असून पैकी १·५ कोटी रुपये दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. मराठवाडा विभागांतील दळणवळणविषयक सोयींत सुधारणा व्हावी म्हणून २·२२ कोटी रुपये खर्चाचा जास्तीचा रस्तेविषयक कार्मक्रम आंखण्यांत आला असून पैकी सुमारें ६६ टक्के रक्कम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत खर्च करण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

याशिवाय मध्यवर्ती सरकारच्या खर्चातून होणाऱ्या राष्ट्रीय सडका, मध्यवर्ती रस्ते–निधीनुसार होणारीं कामें, आर्थिक महत्त्वाचे अथवा आंतरराज्य रस्ते, पश्चिम किनाऱ्यावरील रस्ता आणि राजमार्ग, तसेंच पूल वगैरेंसारख्या कामासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजनाकाळांत २,०३७ लक्ष रुपये खर्च करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. १९६० च्या मार्च अखेर, १,९५० मैल लांब सडका बांधणें व त्यांची दुरुस्ती करणें, ४० छोटे व मोठे पूल बांधणें व त्यांची दुरुस्ती करणें अशी १९५९–६० च्या कार्यक्रमांत तरतूद आहे. १९५८–५९ सालांत १,८१६ मैल लांबीच्या सडका बांधण्यांत आल्या असाव्यात आणि ५५लहान मोठे पूल बांधण्यांत आले असावेत असा अंदाज आहे.

### सहकारी संस्था

१९५९–६० सालीं जवळ जवळ ३,६०० लहान स्वरूपाच्या संस्था स्थापन करण्याचें ठरविण्यांत आलें असून पैकी सुमारें २,००० संस्था नव्यानें स्थापण्यांत येतील. सुमारें १,१०० लहान स्वरूपाच्या संस्थांना त्यांच्या भाग–भांडवलासाठी सरकार-कडून साहाय्य देण्यांत येईल. मोठ्या स्वरूपाच्या १,०३२ संस्थांना आणि लहान स्वरूपाच्या ३,६०० संस्थांना त्यांच्या व्यवस्थापकीय खर्चासाठी मदत देण्यांत येईल.

### शिक्षण

१९५९–६० च्या कार्यक्रमानुसार, आणखी ७१६ प्राथमिक शाळांची (मूलोद्योग शाळांसह) तरतूद करण्यांत आली आहे. प्राथमिक शाळांच्या निरनिराळ्या वर्गांतील विद्यार्थ्यांची संख्या १९५८–५९ सालीं ५८ लक्षांपासून १९५९–६० सालीं ५९·५७ लक्षांपर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे, तर माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या १९५८–५९ सालीं ९·५८

टक्क्यांपासून १९५९-६० सालीं १०.१६ टक्क्यांपर्यंत वाढेल. तसेंच मूलोद्योगी शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या १७,९४,९६३ इतकी होईल तर वर्षभरांत सुमारें ८,००० शिक्षकांना प्रशिक्षण देण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

आरोग्यविषयक कार्यक्रमांत ७४२ डॉक्टर्स, ७२६ नर्सेस, २०३ दाया आणि ४२० मिडवाईव्हजना प्रशिक्षण देण्याची तरतूद आहे.

**घरबांधकाम**

योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत सुमारें १३,१९२ गाळे बांधण्यांत आले असून आर्थिक मदत मिळणाऱ्या औद्योगिक घरबांधकामयोजनेनुसार १९५९-६० सालीं आणखी ७,००० गाळे बांधण्यांत येतील अशी अपेक्षा आहे. कमी मिळकतीच्या लोकांतील गटांसंबंधीच्या घरबांधकाम योजनेनुसार ३१ डिसेंबर १९५८ पर्यंत ४,१६० घरें बांधण्यांत आलीं आणि २,१४७ घरांचें बांधकाम चालू आहे. १९५९-६० असेर आणखी सुमारें १,३५५ घरें बांधण्यांत येतील अशी अपेक्षा आहे.

तसेंच पशुसंवर्धन, डेअरी-विकास, मच्छीमारी, उद्योगधंदे, खाणी यांसारख्या विविध बाबतींतहि बरीच प्रगति करण्यांत आली आहे.

---

फक्त पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडच्या समासदांकरितां

## सूचना

पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची विशेष साधारण सभा गुरुवार दि. २४ सप्टेंबर १९५९ रोजीं दुपारीं ३ वाजतां 'गोखले हॉल' पुणें २ या ठिकाणीं भरणार आहे.

सदर सभेमध्यें खालील कामें करण्यांत येतील.—

(१) मा. रजिस्ट्रारसाहेब, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, मुंबई राज्य, यांच्या जा. क्र. १५४४/७ (FIN) दि. ७-८-५९ च्या हुकमाप्रमाणें बँकेच्या पोटनियम नं. ३३ मधील संचालकांच्या घटनेसंबंधीच्या दुरुस्तीचा फेरविचार करणें.

(२) बँकेच्या पोटनियम नं. ३३ मध्यें संचालकांच्या पात्रतेसंबंधीं संचालक मंडळानें सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करणें.

(३) बँकेचे पोटनियम नं. ५९ व ६२ (अ) चा ५ यांत मा. संचालक मंडळानें मान्य करून सुचविलेल्या दुरुस्त्यांचा विचार करणें.

(४) निवडणुकीच्या नियमांपैकी नियम नं. ३, ७, २४, २५, २७ व २८ यांत मा. संचालक मंडळानें सुचविलेल्या दुरुस्त्या पोटनियम नं. ७६ अनुसार मान्यतेसाठी मांडण्यांत आल्या आहेत, त्यांचा विचार करणें.

(५) मा. अध्यक्षांच्या परवानगीनें ऐनवेळीं येणाऱ्या विषयांचा विचार करणें.

सदर सभेस बँकेच्या सर्व सभासदांनीं अगत्य यावें, अशी विनंती आहे.

पुणें २<br>दिनांक<br>२-९-५९

संचालक मंडळाच्या हुकमावरून,<br>वा. ग. अळतेकर<br>कार्यकारी संचालक.

---

**पुणें सें. को. बँकेसाठी रजिस्ट्रारनें सुचविलेलें बोर्ड**

**( सोसायट्यांचे १३, वैयक्तिक सभासदांचे ६ व नेमलेले प्रतिनिधि ५ )**

सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार, ह्यांच्या हुकुमाप्रमाणें पुणें सें. को. बँकेच्या पोटनियम ३३ मधील दुरुस्तीचा विचार करण्यासाठी बँकेची विशेष साधारण सभा २४ सप्टेंबर रोजीं भरणार आहे. रजिस्ट्रारनें खालीलप्रमाणें बोर्ड असावें, असें सुचविलें आहे :—

(अ) शेतकी सोसायट्यांचे प्रतिनिधि एकूण ११

(ब) बिगरशेतकी सोसायट्यांचे दोन प्रतिनिधि (खालीलप्रमाणें प्रत्येक विभागास एक):—

विभाग क्र. १ पुणें शहर तालुका १

विभाग क्र. २ पुणें शहर तालुका सोडून बाकी सर्व पुणें जिल्हा १

एकूण २

(क) पुणें शहर तालुक्यांतील वैयक्तिक सभासदांनीं निवडावयाचे पांच प्रतिनिधि ५

(ड) पुणें शहर तालुका सोडून बाकी सर्व पुणें जिल्ह्यांतील वैयक्तिक सभासदांनीं निवडावयाचा एक प्रतिनिधि १

(इ) पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ, लि. यांचा एक प्रतिनिधि (त्यांनीं नेमल्यास) १

(फ) मुंबई राज्य सहकारी बँक लि. यांचा एक प्रतिनिधि (त्यांनीं नेमल्यास) १

(ग) मुंबई राज्य सरकारचे, तीनपेक्षा जास्त नाहींत इतके प्रतिनिधि (त्यांनीं नेमल्यास) ३

(ह) एक कार्यकारी संचालक (पदसिद्ध) १

एकूण २५

---

**दि भुसावळ पीपल्स को. बँक लि., भुसावळ**

चेअरमन: आर. एस. पाटील, बी. ए., एलएल. बी.<br>मॅनेजर: जिनाभाई जी. देसाई, बी. कॉम., एफ. आय.एस. ए. (इं.)

शेअर भांडवल १,८९,०२५ रु., सभासदांच्या ठेवी १४,७४,४१७ रु., बिगर-सभासदांच्या ठेवी १७,२०,०७८ रु., गंगाजळी व इतर फंड ३,४४,०६५ रु., येणें कर्ज १३,३४,६०३रु. निव्वळ नफा २८,४२० रु., एकूण भांडवल ४०,७६,९४५ रु., शिफारस केलेलें डिव्हिडंड ६% असे वरील बँकेच्या ३०-६-५९ असेरच्या कारभाराचे प्रमुख आंकडे आहेत. दोन महिन्यांहून अधिक मुदतींची थकबाकी १७,०३१ रु. (१.२७%) आहे; परंतु संशयित व बुडीत फंडाच्या रकमेंतून वजा जातां प्रमाण ०.००% पडतें. कर्जाचें ठेवींशीं प्रमाण ३९.२४% आहे. अहवालाचे वर्षीं बँकेनें सुमारें १२ लक्ष रुपयांचीं १२०२ कर्जे दिलीं; त्यांपैकी ६६४ व्यापारासाठी, ३०६ आजारपणासाठी, ११२ घरदुरुस्तीसाठी, ३४ संस्काराकरितां, ३१ घरें विकत घेण्याकरितां, आणि २२ शिक्षणाकरितां होतीं. बँकेच्या मेडिकल वस्तूंच्या खात्याचा ८७ सभासदांनीं फायदा घेतला.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.